क्र. प्रशि/पोलीस भरती/मार्गदर्शक/पोशि/२००८/1808 मुंबई, दि ३/४/२००८

संदर्भ : या कार्यालयाचे परिपत्रक क्र. प्रशि/भरती/मार्गदर्शक तत्वे/पोशि/२००६/१९३२, दि. १६/५/२००६,

(२) क्र प्रशि/पोभ/चापोशि-बॅंडसमन/२००६/२७८६, दि १५/७/२००६

(३) क्र प्रशि/पोभ/चापोशि-बॅंडसमन/२००६-०७/१४३७, दि २/४/२००७

(४) परिपत्रक प्रशि/पोभ/शंकानिरसन/२००७/३३६५, दि १६/८/२००७.

(५) प्रशि/पोलीस भरती/अलिबाग/२००७/३४४२, दि २१/८/२००७

(६) प्रशि/पोलीस भरती/मार्गदर्शक/पोशि/२००८/१०७४, दि. २५/२/२००८

**विषय : पोलीस शिपाई पदाच्या भरतीबाबतची कार्यपद्धती.**

००००

**परिपत्रक :**

या परिपत्रकान्वये या कार्यालयामार्फत पोलीस शिपाई पदाच्या भरतीबाबत प्रसिद्ध करण्यात आलेली वर नमूद सर्व संदर्भिय परिपत्रके रद्द करण्यात येत आहेत. २५ फेब्रुवारी २००८ च्या परिपत्रकात घटक प्रमुखांनी सुचवलेल्या बदलांचा विचार करून हे सुधारित परिपत्रक निर्गमित करण्यात येत आहे.

पोलीस भरती प्रक्रिया ही अधिक सुरळीत, सुलभ व पूर्ण पारदर्शकता ठेवून करण्यासाठी या परिपत्रकानुसार योग्य ते बदल करावेत.

**ह्या परिपत्रकाद्वारे स्पष्ट करण्यात येते की कोणत्याही घटकात चालक पोलीस शिपाई या पदासाठी भरती करू नये.**

सर्व घटक प्रमुखांना विनंती आहे की, सदरचे परिपत्रक प्राप्त झाल्याची पोच, सत्वर देण्यात यावी.

सदरचे परिपत्रक पोलीस महासंचालक यांच्या संमतीने निर्गमित करण्यात येत आहे.

**(प्रवीण दीक्षित)**
अपर पोलीस महासंचालक, प्रशिक्षण व खास पथके
महाराष्ट्र राज्य, मुंबई.

प्रति,

सर्व पोलीस आयुक्त, रेल्वे सह
सर्व पोलीस अधीक्षक, रेल्वे सह / बिनतारी संदेशसह
सर्व समादेशक, राज्य राखीव पोलीस बल, १ ते १४

प्रत :

संचालक, बिनतारी संदेश विभाग, म.रा, पुणे
अपर पोलीस महासंचालक, राज्य राखीव पोलीस बल, म.रा., मुंबई
विशेष पोलीस महानिरीक्षक, मोटार परिवहन, पुणे

प्रत माहितीकरिता :

सर्व परिक्षेत्रीय विशेष पोलीस महानिरीक्षक

क्र. प्रशि/भरती/मार्गदर्शक तत्वे/पोशि/२००८/१८०८ मुंबई, दि. ०३/०४/२००८

**विषय : पोलीस शिपाई पदाच्या भरतीबाबतची कार्यपद्धती.**

०००

**परिपत्रक :**

पोलीस भरती प्रक्रिया ही अधिक सुरळीत, सुलभ व पूर्ण पारदर्शकता ठेवून करण्यासाठी शासनाने "पोलीस शिपाई सेवा प्रवेश नियम २००६" निर्गमित केले आहेत. २००७ च्या भरतीतील अनुभवाच्या आधारे या कार्यालयामार्फत निर्गमित करण्यात आलेले परिपत्रक क्र. प्रशि/भरती/मार्गदर्शक तत्वे/पोशि/२००६/१९३२, दि. १६/५/२००६, (२) क्र प्रशि/पोभ/चापोशि-बॅंडसमन/२००६/२७८६, दि १५/७/२००६ (३) क्र. प्रशि/पोभ/चापोशि-बॅंडसमन/२००६-०७/१४३७, दि. २/४/२००७ (४) परिपत्रक प्रशि/पोभ/शंकानिरसन/ २००७/ ३३६५, दि १६/८/२००७. आणि (५) प्रशि/पोलीस भरती/अलिबाग/ २००७/३४४२, दि २१/८/२००७, (६) प्रशि/भरती/मार्गदर्शक तत्वे/पोशि/ २००८/१०७४, दि. २५/२/२००८ रद्द करण्यात येत असून पोलीस भरती प्रक्रिया ही अधिक सुरळीत, सुलभ व पूर्ण पारदर्शक होण्यासाठी त्यात योग्य बदल करून खालील सुधारीत मार्गदर्शक तत्वे निर्गमित करण्यात येत आहेत.

**१) रिक्त पदांची गणना:** रिक्त पदांचा आढावा घेताना प्रत्यक्षात असलेली रिक्त पदे, भरतीच्या दिनांकापासून पुढील ६ महिन्यात होणारी रिक्त पदे, सेवानिवृत्ती, पदोन्नती, जिल्हा बदली तसेच नव्याने मंजूर होणारी पदे यांची गणना करावी. अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, वि.जा. /भ.ज. इतर मागास वर्ग इत्यादींच्या आरक्षणासह विचारात घेवून एकूण रिक्त पदे अपर पोलीस महासंचालक, प्रशिक्षण व खास पथके, म.रा., मुंबई यांच्या कार्यालयात भरतीच्या एक महिना अगोदर कळविण्यात यावीत.

पोलीस भरतीचा दिनांक अपर पोलीस महासंचालक,(प्रशिक्षण) हे पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांची मान्यता घेवून निश्चित करतील व त्याप्रमाणे निश्चित केलेल्या एकाच दिवशी सर्व संबंधित पोलीस घटकामध्ये पोलीस भरती घेण्यात यावी.

**२) वयोमर्यादा निश्चितीकरिता दिनांक (Cut off date):** पोलीस शिपायांच्या भरतीकरिता उमेदवाराची वयोमर्यादा निश्चित करण्यासाठी, ज्या महिन्यात भरती जाहीर केली असेल त्या महिन्याच्या लगत पूर्वीच्या महिन्याची शेवटची तारीख धरण्यात यावी. (उदा. भरती १७/८/२००८ रोजी असल्यास ३१/०७/२००८ रोजी १८ वर्षे वय पूर्ण करणारा भरतीस पात्र होईल).

**३) जाहिरात :** शासन निर्णय सामान्य प्रशासन विभाग क्र. संकीर्ण/१०३३/प्रक्र-९६/२००३/१३-अ, दि. १९/११/२००३ चे परिपत्रकानुसार व मा. सर्वोच्च न्यायालय, नवी दिल्ली यांनी सिव्हील ॲप्लीकेशन क्र. ११६४६/११७२४/१९९६ प्रकरणी दि. २२/८/१९९५ रोजी निर्गमित केलेल्या सूचनांनुसार रिक्त पदे भरावीत. रोजगार आणि स्वयंरोजगार केंद्र, जिल्हा सैनिकी बोर्ड, समाज कल्याण अधिकारी, आदिवासी विकास विभाग

इत्यादी संस्थाना सदर जाहिरातीस जास्तीत जास्त प्रसिध्दी देण्यास विनंती करावी. त्याच बरोबर रिक्त पदांबाबत स्थानिक वर्तमानपत्रांमध्ये (उदा. मराठी, हिंदी, इंग्रजी, उर्दू इत्यादी भाषेतील) जाहिरात देवून, रेडिओ, दूरदर्शन इत्यादी प्रसिद्धी माध्यमांद्वारे, तसेच पोलीस वेबसाईटवर व पोलीस मुख्यालयाच्या फलकावर प्रसिद्धी देवून संबंधित पदांसाठी सेवा शर्ती पूर्ण करणाऱ्या उमेदवारांचे आवेदन अर्ज प्राप्त झाल्यानंतर विहित पद्धतीनुसार पोलीस भरतीकरिता निवड करावी.

सोबत जोडलेल्या जाहिरातीच्या नमुन्याप्रमाणेच प्रत्येक घटकाने जाहिरात प्रसिध्द करावी. स्थानिक पातळीवर त्यात कोणतेही बदल करण्यात येवू नयेत. असे बदल केल्यास ते अनधिकृत समजले जातील व संबंधित घटक प्रमुखांना त्यासाठी जबाबदार धरले जाईल.

**४) आवेदन अर्ज (Application Form) :** अपर पोलीस महासंचालक, प्रशिक्षण व खास पथके, मुंबई यांचे कार्यालयाने विहित केलेल्या प्रवेश अर्जाच्या नमुन्याप्रमाणे प्रत्येक उमेदवाराने पोलीस शिपाई पदासाठी अर्ज भरणे आवश्यक राहील. भरती करणाऱ्या घटकाने अर्ज जरूरीप्रमाणे छापावे. आवेदन अर्जावर अनुक्रमांक छापू नये. शक्य असल्यास आवेदन अर्ज भरती करण्यात येणाऱ्या घटकाच्या वेबसाईट (संकेतस्थळावर) उपलब्ध ठेवण्यात यावा. उमेदवाराने छापील अर्ज किंवा संकेतस्थळावरून डाऊनलोड केलेला अर्ज किंवा स्पष्ट झेरॉक्स असलेला अर्ज आणला तरी तो स्वीकारण्यात यावा. अर्ज स्वीकारतांना रू. ५०/- ची इंडीयन पोस्टल ऑर्डर किंवा डिमांड ड्राफ्ट घेण्यात यावा.

**५) आवेदन अर्ज स्विकारतांना घ्यावयाची काळजी :** अर्ज स्वीकारताना इंडियन पोस्टल ऑर्डर किंवा डिमांड ड्राफ्ट मध्ये लिहीण्यात आलेल्या घटक प्रमुखांचे नाव अचूक आहे याची खात्री करण्यात यावी.

अर्ज स्वीकारल्यानंतर उमेदवाराला प्रवेश पत्र देण्यात यावे. प्रवेश पत्रावर आवेदन अर्ज स्वीकृती क्रमांक उमेदवाराचे नाव, जिल्हा नमुद करून त्यावर फोटो लावावा. प्रवेशपत्रावर कार्यालयाचा शिक्का व अधिकाऱ्याने सही करावी. उमेदवार कोणत्याही चाचणीत अनुत्तीर्ण झाल्यास, त्यावेळी हे प्रवेशपत्र त्यांचेकडून जमा करण्यात यावे. परीक्षकांनी व उमेदवाराने शारीरिक आणि लेखी, तोंडी चाचणीच्या वेळी संबंधित कागदपत्रावर नाव न लिहिता सदर अर्ज स्वीकृती क्रमांक लिहावा.

**६) अर्ज व प्रमाणपत्रांची तपासणी :** सर्व प्रमाणपत्रे (जसे १२वी उत्तीर्ण, Domicile व Non-Creamylayer) प्रकल्पग्रस्त, खेळाडू संवर्गाचे प्रमाणपत्र ई. भरतीच्या दिनांकाच्या आधीची असणे आवश्यक आहे. छाननीच्या वेळी मूळ प्रमाण पत्रे दाखवणे बंधनकारक आहे. जातीच्या वैधता प्रमाणपत्रासाठी अर्ज केलेला असल्यास संबंधित विभागाकडे अर्ज दाखल केल्याची मूळ पावती अर्जदाराने अर्जासोबत सादर करणे बंधनकारक राहील, व पोलीस पदावर नियुक्ती झाल्यास सदरचे प्रमाणपत्र ६ महिन्याच्या आत सादर करणेबाबतचे हमी पत्र लिहून घेण्यात यावे. हमीपत्रामध्ये विहित केलेल्या कालावधीमध्ये प्रमाणपत्र सादर न केल्यास संबंधित उमेदवाराची नियुक्ती रद्द करण्यात यावी.

यासंदर्भात सामाजिक न्याय, सांस्कृतिक कार्य व विशेष सहाय्य विभाग, शासन परिपत्रक क्रमांक सीबीसी १०/२००६/ प्र.क्र.१५/ मावक ५ दिनांक : ५ जून, २००६ चे पहावे.

**७) शारीरिक पात्रता व शारीरिक चाचणी:** अर्ज व प्रमाणपत्रातील विहित अटी / शर्तीची पूर्तता करणाऱ्या उमेंदवारांची उंची व छातीचे मोजमाप घ्यावे. भरतीच्या स्थळी उमेदवारांकडून त्यांच्या उंची / छातीचे मोजमापाबाबत तक्रार आल्यास सदर कामी नेमणुकीस असलेल्या पोलीस उपअधीक्षक (गृह) / उप विभागीय पोलीस अधिकारी यांनी त्यांच्या प्रत्यक्ष देखरेखीखाली फेर मोजमाप घ्यावे व त्याचा तपशील स्वतः भरती नोंदवहीत नोंदवावा. पोलीस उपअधीक्षक (गृह) / उपविभागीय पोलीस अधिकारी यांनी यासंबंधी घेतलेला निर्णय अंतिम राहील. विहित शारीरिक पात्रतेनुसार अपात्र ठरविण्यात आलेल्या उमेंदवारांना लेखी लगेचच कळवावे.

जे उमेदवार उंची व छाती मध्ये शारीरिक मोजमाप पात्रतेनुसार पात्र ठरतील, त्यांच्या सर्व प्रमाणपत्रांची सुक्ष्मरीत्या छाननी करण्यांत यावी व विहीत नियमावलीनुसार ते सर्व शैक्षणिक किंवा विशिष्ट उमेदवारांच्या जसे खेळाडू, प्रकल्पग्रस्त, गृहरक्षकदल, बॅन्डसमन, माजी सैनिक इत्यादी अटी व शर्ती पूर्ण करीत असल्याची शंभर टक्के खात्री आधी करावी व त्यात योग्य आढळून आल्यास त्यांना शारीरिक चाचणीकरिता भाग घेण्यासाठी परवानगी देण्यात यावी.

शारीरिक मोजमाप पात्रतेची पूर्तता करणाऱ्या उमेदवारांची शारीरिक चाचणी (Physical Test) १०० गुणांसाठी घेण्यात यावी.

शारीरिक चाचणी घेतांना परिशिष्ट "अ" मध्ये जोडलेल्या तक्त्याच्या अनुषंगाने गुण देवून प्रत्येक प्रात्यक्षिक संपल्यानंतर उमेदवाराला त्याचे गुण कळवावेत, तसेच सर्व प्रात्याक्षिक संपल्यानंतर सर्व गुण एकत्रित करून मुख्यालयाच्या नोटीस बोर्डावर लवकरात लवकर लावणे आवश्यक राहील.

**८) लेखी परीक्षा:** शारीरिक चाचणी मध्ये कमीत कमी ५०% गुण मिळवून १:१५ या प्रमाणकात बसणाऱ्या त्या त्या प्रवर्गातील गुणवत्तेनुसार आलेल्या आणि सदरच्या प्रमाणकानुसार शेवटच्या उमेदवारास जेवढे गुण मिळालेले आहेत तेवढे समान गुण मिळविणाऱ्या सर्व उमेदवारांची ७५ गुणांची लेखी परीक्षा घेतली जाईल. (उदाहरण: १०० पदांसाठी जाहिरात दिल्यास, विविध प्रवर्गातून बाह्यवर्ग चाचणी पूर्ण करणाऱ्या व ५०% हून अधिक गुण मिळविणाऱ्या उमेदवारांमधून १:१५ या प्रमाणकानुसार उमेदवार लेखी परीक्षेसाठी पात्र असतील. १ पदासाठी १५ उमेदवारांना लेखी चाचणीसाठी पात्र ठरविण्यात येईल. जर १० पदे अनुसूचित जाती, १० पदे अनुसूचित जमाती, ५ पदे वि.जा./भ.ज. असल्यास १० x १५=१५० उमेदवार अनुसूचित जाती या प्रवर्गातून १० x १५=१५० अनुसूचित जमातीतील आणि ५ x १५ = ७५ वि.जा./भ.ज. चे उमेदवार त्या प्रवर्गातील लेखी परीक्षेसाठी पात्र ठरतील. तसेच अनुसूचित जातीतील १५० व्या उमेदवारास जेवढे गुण असतील तेवढेच गुण असलेले त्या प्रवर्गातील सर्व उमेदवार लेखी परीक्षेसाठी पात्र ठरतील. तसेच अनुक्रमे

अनुसूचित जमातीचा १५० वा उमेदवार व वि.जा./भ.ज. प्रवर्गातील ७५ व्या उमेदवारास मिळालेल्या गुणा इतकेच गुण मिळालेले उमेदवार सुद्धा संबंधित प्रवर्गातून लेखी परीक्षेस पात्र ठरतील.)

सामाजिक आरक्षण असलेल्या प्रत्येक गटात समांतर आरक्षणाप्रमाणे उपलब्ध उमेदवार आलेले आहेत याची खात्री करणे बंधनकारक आहे. उदा. इतर मागास वर्गातील १:१५ प्रमाणे १०० उमेदवार असल्यास उपलब्ध माजी सैनिकांपैकी १५ उमेदवार (१५% ), खेळाडू ५ उमेदवार (५%), भूकंपग्रस्त ३ उमेदवार (३%), प्रकल्पग्रस्त २ उमेदवार (२%), गृहरक्षक दल ५ उमेदवार (५%) अशा उमेदवारांना निवड प्रक्रियेत संधी देणे बंधनकारक आहे. याचप्रमाणे प्रत्येक सामाजिक आरक्षणाच्या गटात हीच प्रक्रिया राबविण्यात यावी. (संदर्भः शासन परिपत्रक क्रमांक एसआरव्ही-१०९७/प्र.क्र.३१/९८/१६-अ, दि. १६/३/१९९९)

लेखी परीक्षेमध्ये १) चालू घडामोडी व सामान्य ज्ञान २) अंकगणित व ३) निबंध लेखन या विषयांचा समावेश असेल. प्रश्न पत्रिका ६० गुणांची पर्यायी स्वरूपाची (Objective Type) व १५ गुणांची सविस्तर वर्णनात्मक स्वरूपाची अशी ज्यात निबंध (Essay) हा विषय राहील. निबंध फक्त मराठी भाषेमध्ये लिहणे आवश्यक आहे. लेखी चाचणी परीक्षेच्या उत्तरपत्रिकेतील "निबंध" हा विषय तपासण्यासाठी त्या विषयातील इच्छुक माहितगार / जाणकार / तज्ञ अधिकाऱ्याची निवड करून त्यांची यादी तयार ठेवण्यात यावी. निबंध तपासणीची पद्धत ही प्रमाणबध्द (Standardized) असावी. निबंध तपासणीच्या वेळी सर्व उमेदवारांकरिता एकच प्रमाणबध्द मापदंड असावेत. उदा. सुवाच्य हस्ताक्षर, विषयाची मुद्देसूद मांडणी, नीट नेटकेपणा व विषयानुरूप सकारात्मक दुष्टीकोन इ. उत्तर पत्रिका तपासण्याची पद्धत पारदर्शक असावी व त्याप्रमाणे पारदर्शकता प्रत्यक्षात स्पष्टपणे दिसून यायला हवी. उत्तरपत्रिकेतील गुणांच्या बेरजेच्या संख्येत नोंद घेताना खाडाखोड झाल्यास किंवा गुणांच्या संख्येत पुन्हा गिरवणी (overwriting) करण्यात आल्यास अशा ठिकाणी संबंधित अधिकारी (उत्तरपत्रिका तपासणीस) स्वतःची सही करून प्रमाणित करेल.

बँडस्मन पदाकरिता इयत्ता १० वी उत्तीर्ण उमदेवार पात्र असल्याने त्यांची वरील प्रमाणे वेगळी लेखी परीक्षा घेण्यात यावी. सदर लेखी परीक्षेमध्ये १) चालू घडामोडी व सामान्य ज्ञान, २) अंकगणित, आणि ३) पाच पैकी कोणत्याही तीन मुद्यांवर थोडक्यात मराठीत माहिती (Short Notes) लिहा अशा प्रकारचे प्रश्न असतील.

पर्यायी स्वरूपाची प्रश्नपत्रिका (Objective type) सोडविण्यासाठी स्वतंत्र उत्तरपत्रिका ठेवण्यात यावी व सदर उत्तर पत्रिका शक्यतो संगणकाद्वारे तपासावी. उत्तर पत्रिका तयार करण्याकरिता व तपासण्याकरिता संगणक तज्ञाकडून आवश्यक त्या सूचना घ्याव्यात. उत्तर पत्रिका संगणकाद्वारे तपासणे शक्य नसल्यास त्याबाबतची सविस्तर कारणे लेखी स्वरूपात नमूद करावीत. व ती त्वरीत या कार्यालयास बिनतारी संदेशाने कळवावीत.

जर कोणत्याही उमेदवाराने उत्तर पत्रिकेतील गुणांबद्दल तक्रार केल्यास उत्तर पत्रिका परत तपासली जाणार नाही हे स्पष्ट करण्यात यावे. परंतु उत्तर पत्रिकेमध्ये गुणांची बेरीज बरोबर आहे किंवा नाही या संबंधी पोलीस उपअधीक्षक (गृह) हे पुन्हा गुणांची मोजणी करतील व त्यांचा निर्णय अंतिम राहील. गुणांच्या

बेरजेसंबंधी कोणाची तक्रार असल्यास ती २४ तासाचे आत स्वीकारण्यात येईल. त्यानंतर केलेली तक्रार विचारात घेतली जाणार नाही.

लेखी परीक्षेचा निकाल शक्यतो २४ तासामध्ये जाहीर करावा. उमेदवारांची संख्या मोठी असल्यास निकाल लवकरात लवकर सूचना फलकावर लावण्यात यावा. ही सूचना घटकांची वेबसाईट उपलब्ध असल्यास वेबसाईटवरही उपलब्ध करून देण्यात यावी.

**९) मुलाखत चाचणी :** मुलाखतीसाठी पात्र होण्याकरिता लेखी परीक्षेत कमीत कमी ३८ गुण मिळवणे आवश्यक आहे. शारीरिक चाचणी व लेखी चाचणी यांच्या गुणांच्या एकत्रीकरणानंतर (१७५ गुणांपैकी) गुणवत्ता क्रमानुसार प्रसिद्ध केलेल्या जाहिरातीत नमूद केलेल्या प्रवर्ग निहाय पदसंख्येच्या १:८ या प्रवर्ग निहाय प्रमाणात उमेदवारांना मुलाखत चाचणीसाठी पात्र ठरविण्यात येईल. सदरच्या प्रमाणकानुसार शेवटच्या उमेदवारास जेवढे गुण मिळालेले आहेत तेवढे समान गुण मिळविणाऱ्या सर्व उमेदवारांना मुलाखत चाचणीकरिता बोलविण्यात यावे. क्रमांक ८ मध्ये स्पष्ट केल्याप्रमाणे सामाजिक आरक्षण असलेल्या प्रत्येक गटात समांतर आरक्षणाप्रमाणे उपलब्ध असलेले उमेदवार आले आहेत याची खात्री करणे बंधनकारक आहे.

(उदाहरण : लेखी परीक्षा किमान ३८ गुण मिळवून उत्तीर्ण झाल्यानंतर मैदानी व लेखी परीक्षेचे (एकूण १७५ गुणांपैकी ) गुण एकत्रित करून मुलाखत चाचणीकरिता १:८ या प्रमाणात उमेदवार संबंधित प्रवर्गासाठी पात्र ठरतील. **उदा.** जर १० पदे अनुसूचित जाती , १० पदे अनु. जमाती , ५ पदे वि.जा./भ.ज. असल्यास १० x ८=८० उमेदवार अनुसूचित जाती या प्रवर्गातून १०x८ = ८० अनुसूचित जमातीतील आणि ५ x ८= ४० वि.जा./भ.ज. चे उमेदवार त्या प्रवर्गातील मुलाखतीसाठी पात्र ठरतील. तसेच अनुसूचित जातीतील ८० व्या उमेदवारास जेवढे गुण असतील तेवढेच गुण असलेले त्याच प्रवर्गातील सर्व उमेदवार मुलाखतीसाठी पात्र ठरतील. तसेच अनुक्रमे अनुसूचित जामातीचा ८० वा उमेदवार व वि.जा./भ.ज. प्रवर्गातील ४० व्या उमेदवारास मिळालेल्या गुणा इतकेच गुण मिळालेले उमेदवार सुद्धा संबंधित प्रवर्गातून मुलाखतीस पात्र ठरतील. ह्या प्रत्येक प्रवर्गात उपलब्ध असल्यास माजी सैनिक (१५%) खेळाडू (५%), भूकंपग्रस्त (३%), प्रकल्पग्रस्त (२%) व गृहरक्षक दल (५%) घेणे बंधनकारक आहे.

मुलाखत चाचणी एकूण २५ गुणांची असेल, त्यात खालील विषयांचा समावेश असेल.

(१) उमेदवारांचे सर्वसाधारण व्यक्तिमत्व (२) क्रीडा, (३) एन.सी.सी. (४) इतर विशेष कार्यक्षमता उदा. वाहन चालविण्याचे ज्ञान, संगणक हाताळण्याचे ज्ञान अथवा अन्य तांत्रिक विषयावरील प्रशिक्षण / उच्च शिक्षण. जे उमेदवार जड वाहन चालक किंवा हलके वाहन चालक परवाना धारक असतील त्यांना गुण देताना त्याप्रमाणे गुण द्यावेत.

पोलीस प्रक्रियेतील प्रत्येक चाचणीकरिता उमेदवारांना देण्यात येणारे गुण शाईने नोंदवावेत. पेन्सीलचा उपयोग कोठेही करू नये.

**मुलाखत चाचणीकरिता निवड मंडळ खालील प्रमाणे राहील.**

१) आयुक्तालय / जिल्ह्यातील पोलीस उपआयुक्त / पोलीस अधीक्षक / समादेशक.

२) जिल्ह्यातील व आयुक्तालयातील (मुंबई, पुणे, ठाणे, नागपूर वगळून) भरतीसाठी पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांनी नेमून दिलेले प्रतिनिधी असतील. मुंबई, पुणे, ठाणे, नागपूर आयुक्तालय येथे आयुक्त यांनी पोलीस उपआयुक्त दर्जाचा अधिकारी नेमावा.

३) पोलीस भरतीसाठी गठीत करावयाच्या निवड मंडळावर निवासी उपजिल्हाधिकारी हे अल्पसंख्यांक समाजाचे नसल्यास, त्या दर्जाचा कोणत्याही विभागातील अल्पसंख्याक समाजाचा अधिकारी नेमण्यात यावा. संबंधित जिल्ह्यात / आयुक्तालयात असा अधिकारी उपलब्ध नसल्यास, परिक्षेत्रीय पोलीस महानिरीक्षक / विभागीय आयुक्त, यांच्याशी विचारविनिमय करून संबंधित महसूल विभागातील / पोलीस परिक्षेत्रातील कोणत्याही विभागाचा त्या दर्जाचा अधिकारी नेमण्यात यावा. (शासन पत्र क्र.एमआयएस-३२००/सीआर-४७५/पोल-५अ, दि.३/१/२००३)

४) समाजकल्याण अधिकारी.

५) आदिवासी विकास अधिकारी.

६) जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी.

७) जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी (शासन निर्णय क्र. संकीर्ण-२०००/ प्र.क्र.-११९/का-२, दि. २/१/२००१)

**१०) गुणवत्ता यादी :** उमेदवारांची "शारीरिक चाचणी", "लेखी चाचणी' व "मुलाखत चाचणीचे" गुण एकत्रित करून गुणवत्ता यादी तयार करावी. बँडसमनची स्वतंत्र गुणवत्ता यादी तयार करावी. शेवटच्या उमेदवाराची मुलाखत संपल्यानंतर शक्य तो २४ तासात अथवा उमेदवारांची संख्या मोठी असल्यास लवकरात लवकर भरतीचा अंतिम निकाल सूचना फलकावर लावून जाहीर करण्यात यावा. २४ तासाच्या आत अंतिम निकाल जाहीर करणे शक्य नसल्यास सूचना फलकावर तशा सूचना लिहून निश्चित तारीख व वेळ उमेदवारांना कळविण्यात यावी.

निवड करण्यात आलेले जे उमेदवार वैद्यकीय दृष्टया पात्र ठरतील त्यांना आरक्षित पदानुसार पोलीस शिपाई पदासाठी योग्य समजण्यात यावे. ह्या उमेदवारांची साक्षांकन नमुना व चारित्र्य पडताळणी करण्यात यावी. व जे योग्य उमेदवार असतील त्यांची शिपाई पदावर नेमणूक करावी. बॅण्डसमन् पदासाठी निवड केलेल्या उमेदवारांची वेगळी गुणवत्ता यादी तयार करून सदरची पदे भरावीत.

निवड करण्यात आलेल्या उमेदवारांच्या फक्त १० टक्के इतकेच उमेदवार प्रतीक्षा यादीवर ठेवावेत. ही प्रतीक्षा यादी फक्त त्या भरतीमधील निवड झालेला उमेदवार अपात्र ठरल्यास / गैरहजर राहिल्यास लागू होईल. भविष्यात रिक्त होणाऱ्या पदांसाठी सदरची प्रतीक्षा यादी लागू होणार नाही. तसेच भरतीच्या वेळी जितक्या जागा अधिसूचित करण्यात आल्या असतील तेवढयाच जागा निवड यादी व प्रतीक्षा यादीतून भराव्यात. प्रतीक्षा यादी ६ महिने पर्यंत अस्तित्वात राहील.

## ११)  घटक प्रमुखांसाठी सूचना :

१) विविध प्रसार माध्यमाद्वारे देण्यात आलेल्या जाहिरातीच्या प्रती, जाहिरात दिल्या दिनांकापासून २ दिवसाच्या आत अपर पोलीस महासंचालक, प्रशिक्षण कार्यालयास सादर कराव्यात.

२) प्रवेश अर्ज स्वीकारण्याची अंतिम तारीख व वेळ जाहिरातीमध्ये नचुकता नमूद करण्यात यावी.

३) भरती प्रक्रिया ही तटस्थपणे, निःपक्षपातीपणे व पारदर्शक (Neutral, impartial and transparent) होणे आवश्यक असून भरती प्रक्रियेत कोणताही गैरप्रकार व भ्रष्टाचार होणार नाही यासाठी आयुक्तलयातील भरतीकरिता पोलीस आयुक्त हे "दक्षता अधिकारी" म्हणून काम पहातील तसेच जिल्ह्यातील परिक्षेत्राअंतर्गत येणाऱ्या पोलीस घटकांत होणाऱ्या भरतीमध्ये "दक्षता अधिकारी' म्हणून त्या त्या परिक्षेत्रातील विशेष पोलीस महानिरीक्षक हे काम पहातील. राज्य राखीव पोलीस बलामधील भरतीप्रक्रियेवर अपर पोलीस महासंचालक, राज्य राखीव पोलीस बल, मुंबई हे "दक्षता अधिकारी" म्हणून काम पहातील.

४) भरतीच्या प्रक्रिये दरम्यान खंड न देता ती सलगपणे लवकरात लवकर पूर्ण करण्यात यावी जेणे करून भरतीच्या कामाचा ताण कमी कमी होत जावून विनाकारण तक्रारी करण्यास कोणासही वाव मिळणार नाही.

५) घटक प्रमुखांनी व दक्षता अधिकारी यांनी पोलीस भरतीच्यावेळी दक्ष राहून भरती प्रक्रिया व्यवस्थित होत आहे याची काळजी घ्यावी व त्याप्रमाणे पोलीस बंदोबस्त ठेवावा. भरतीकरिता नेमणूक केलेल्या अधिकाऱ्यांना / कर्मचाऱ्यांना वेगळे ओळखपत्र द्यावे व ते त्यांनी भरतीच्या वेळी गणवेषावर लावणे बंधनकारक राहील. बाहेरील कोणत्याही व्यक्तींना भरती परिसरात प्रवेश करू देवू नये. भरती परिसरात नेमलेले अधिकारी आणि कर्मचारी मोबाईल फोनचा वापर करणार नाहीत याची दक्षता कटाक्षाने घेण्यात यावी. उमेदवारांच्या सोयीसाठी जागोजागी सूचनांचे फलक लावावे. P.A. System, फिरते प्रसाधनगृहाची (Mobile Toilets) व्यवस्था करावी, भरतीकालावधीत वैद्यकीय सेवेची सोय, पिण्याचे पाणी, उपहार गृह इत्यादीची भरतीप्रक्रीये पुरती सोय करावी.

६) उमेंदवारांची भरती संदर्भात कोणत्याही बाबतीत काही तक्रार / शंका असल्यास किंवा भरती प्रक्रियेत गैरप्रकार होत असल्याचे दिसून आल्यास, अशी बाब कोणताही उमेदवार संबंधित पोलीस घटकातील पोलीस आयुक्त / पोलीस अधीक्षक / समादेशक/ अपर पोलीस महासंचालक,परिक्षेत्रीय / अपर पोलीस महासंचालक,राज्य राखीव पोलीस बल किंवा पोलीस महासंचालक यांच्या प्रतिनिधीच्या (DGP's Observer) निदर्शनास आणून देवू शकेल. याकरिता संबंधित अधिकाऱ्यांचे सूचना फलकावर त्यांचा नाव व दूरध्वनी क्रमांक देण्यात यावा जेणे करून उमेदवाराला तक्रारीसाठी संपर्क साधणे सोईचे होईल.

७) तसेच भरती प्रक्रीयेच्यावेळी असे निदर्शनास आले आहे की काही लोक (दलाल) हे उमेदवारांशी संपर्क साधून पैशांच्या मोबदल्यात भरतीत निवड निश्चित करण्याचे प्रलोभन दाखविण्याचे प्रकार घडत असतात. तरी अशा दलालांना प्रतिबंध करण्यासाठी सर्व घटक प्रमुखांनी दक्ष राहून भरतीचे ठिकाणी योग्य तो बंदोबस्त ठेवावा. त्याबाबत सर्व उमेंदवारांना आवश्यक त्या सूचना देण्यात याव्यात.

८) पोलीस भरतीमध्ये कोणत्याही प्रकारचा गैरप्रकार होवू नये याकरिता भरतीच्या संपूर्ण प्रक्रीयेवर लाचलुचपत प्रतिबंधक विभाग तसेच राज्य गुप्तवार्ता विभागांच्या दक्षता पथकाकडून बारकाईने लक्ष ठेवण्यात येईल.

९) पोलीस भरतीकरिता विहित केलेल्या सेवा प्रवेश नियम व त्यासंबंधातील शासन निर्णयांची व मार्गदर्शक तत्त्वांचा बारकाईने अभ्यास करून त्यानुसार घटक प्रमुखांनी पोलीस भरतीबाबत कार्यवाही करावी.

१०) पोलीस भरतीमध्ये माजी सैनिकांना ३ पैकी २ चाचण्यांमध्ये ५ टक्के गुण देण्यासंबंधी गृह विभाग क्र एमआयएस-०३०२/सीआर-११०/पोल-५अ, दि. १४/१/२००५ अन्वये निर्गमित करण्यात आलेले आदेश रद्द समजण्यात यावेत.

११) नक्षलवाद्यांच्या हल्ल्यांत जायबंदी / मृत्यू झालेल्या शासकीय सेवेतील व्यक्तीच्या कुटुंबियांना शासन सेवेत अनुकंपा तत्त्वावर सामावून घेण्याबाबत शसन निर्णय अकंपा-१००६/प्र.क्र.-१७४/०६/आठ, दि. १७/७/२००७ खालील प्रमाणे सुधारणा करण्यात आलेल्या आहेत. तरी घटक प्रमुखांनी अनुकंपाची पदे भरतांना खालील सुधारणा विचारात घ्याव्यात.

क) गट अ/ब/क/ड मधील शासकीय अधिकारी अथवा कर्मचाऱ्यांना नक्षलवादी / आतंकवादी / दरोडेखोर/समाजविघातक यांच्या हल्ल्यात / कारवाईत मृत्यू आल्यास अशा अधिकारी अथवा कर्मचाऱ्यांच्या पात्र कुटुंबियांतील एका व्यक्तीस अनुकंपा नियुक्ती अनुज्ञेय राहील व या प्रयोजनार्थ प्रचलित योजनेत विहित केलेल्या ५ टक्के मर्यादेमध्ये त्यांना नियुक्ती देण्यात यावी.

ख) गट अ/ब/क/ड मधील जे शासकीय अधिकारी अथवा कर्मचारी नक्षलवादी / आंतगवादी / दरोडेखोर / समाजविघातक यांच्या हल्ल्यात / कारवाईमध्ये कायम स्वरूपी जायबंदी अधिकारी / कर्मचाऱ्यांच्या पात्र कुटुंबियांतील एका व्यक्तीस वर विहित केलेल्या ५ टक्के मर्यादेमध्ये नियुक्ती देण्यात यावी.

ग) अनुकंपा नियुक्तीसाठी पात्र ठरविलेल्या कुटुंबियांच्या व्याख्येची व्याप्ती वाढवून त्यामध्ये घटस्फोटित / परीत्यक्ता/ विधवा मुलींना/ बहिणींना पात्र कुटुंबीय म्हणून समाविष्ट करण्यात यावे. मात्र, याबाबत मृत अधिकारी / कर्मचाऱ्यांच्या पत्नी / पती ने कोणाची अनुकंपा तत्त्वावर नियुक्ती करावी याबाबत नामांकन देणे आवश्यक राहील. मृत अधिकारी / कर्मचाऱ्यांचे पती / पत्नी ह्यात नसल्या त्याच्या/ तिच्या सर्व पात्र कुटुंबियांनी एकत्रित येऊन कोणाची नियुक्ती करावी याबाबत नामांकन करावे.

१२) **बाह्य मदतनीस म्हणून अधिकाऱ्याची नेमणूक :** पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचा प्रतिनिधी म्हणून पोलीस अधीक्षक/पोलीस उपआयुक्त दर्जाचा एक अधिकारी पदनामाने (By designation) प्रत्येक पोलीस घटकात (पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई / ठाणे शहर / पुणे शहर / नागपूर शहर वगळून) पोलीस भरतीमध्ये निवड मंडळाचा सदस्य म्हणून नेमण्यात येईल. सदरचा अधिकारी त्याला नेमून दिलेल्या पोलीस घटकात न चुकता भरतीच्या वेळी हजर राहून भरतीच्या प्रक्रियेतील प्रत्येक स्तरावर

पारदर्शकता राहील व नियमानुसार भरती होत आहे, याची खात्री करेल. भरती प्रक्रिया संपल्यानंतर प्रत्येक टप्यातील अगदी जाहिरातीपासून ते उमेदवारांच्या अंतिम निवडीपर्यंतची विस्तृत माहिती (अहवाल), संबंधित पोलीस अधिकारी अपर पोलीस महासंचालक, (प्रशिक्षण) यांचेकडे १० दिवसांच्या आत न चुकता सादर करेल.

सदरचे परिपत्रक पोलीस महासंचालक यांच्या सहमतीने निर्गमित करण्यात येत आहे.

**(प्रवीण दीक्षित)**
अपर पोलीस महासंचालक, प्रशिक्षण व खास पथके
महाराष्ट्र राज्य, मुंबई.

## परिशिष्ट अ
## पोलीस शिपाई पदांच्या प्रशिक्षणासाठी उमेदवारांची निवड करण्याकरिता ध्यावयाची शारीरिक चाचणी परीक्षा (पुरुष उमेदवारांकरिता)

शारीरिक चाचणीमध्ये खालील बाबींचा समावेश असेल व त्याकरिता एकूण गुण १०० असतील -

**(१) १०० मीटर धावणे -** यासाठी उमेदवारास खालीलप्रमाणे गुण देण्यात येतील :

| **संपूर्ण १०० मीटरचे अंतर धावण्यास लागणारा कालावधी (सेकंदामध्ये)** | **गुण** |
|---|---|
| ११.५० सेकंद किंवा त्यापेक्षा कमी | २५ |
| ११.५० सेकंदापेक्षा जास्त परंतु १२.५० सेकंद सेकंद किंवा त्यापेक्षा कमी | २१ |
| १२.५० सेकंदापेक्षा जास्त परंतु १३.५० सेकंद किंवा त्यापेक्षा कमी | १८ |
| १३.५० सेकंदापेक्षा जास्त परंतु १४.५० सेकंद किंवा त्यापेक्षा कमी | १५ |
| १४.५० सेकंदापेक्षा जास्त परंतु १५.५० सेकंद किंवा त्यापेक्षा कमी | १२ |
| १५.५० सेकंदापेक्षा जास्त परंतु १६.५० सेकंद किंवा त्यापेक्षा कमी | ९ |
| १६.५० सेकंदापेक्षा जास्त परंतु १७.५० सेकंद किंवा त्यापेक्षा कमी | ६ |
| १७.५० सेकंदापेक्षा जास्त परंतु १८.५० सेकंद किंवा त्यापेक्षा कमी | ३ |
| १८.५० सेकंदापेक्षा जास्त | ० |

उमेदवार **१०० मीटरचे अंतर धावू न शकल्यास त्यास शुन्य गुण देण्यात येतील.**

**(२) ८०० मीटर धावणे** - यासाठी उमेदवारास खालीलप्रमाणे गुण देण्यात येतील :-

| **संपूर्ण ८०० मीटरचे अंतर धावण्यास लागणारा कालावधी (मिनिटांमध्ये)** | **गुण** |
|---|---|
| २.१५ मिनिटे किंवा त्यापेक्षा कमी | २५ |
| २.१५ मिनिटांपेक्षा जास्त परंतु २.२५ मिनिटे किंवा त्यापेक्षा कमी | २३ |
| २.२५ मिनिटांपेक्षा जास्त परंतु २.३५ मिनिटे किंवा त्यापेक्षा कमी | २१ |
| २.३५ मिनिटांपेक्षा जास्त परंतु २.४५ मिनिटे किंवा त्यापेक्षा कमी | १९ |
| २.४५ मिनिटांपेक्षा जास्त परंतु २.५५ मिनिटे किंवा त्यापेक्षा कमी | १७ |
| २.५५ मिनिटांपेक्षा जास्त परंतु ३.०५ मिनिटे किंवा त्यापेक्षा कमी | १५ |
| ३.०५ मिनिटांपेक्षा जास्त परंतु ३.१५ मिनिटे किंवा त्यापेक्षा कमी | १२ |
| ३.१५ मिनिटांपेक्षा जास्त परंतु ३.२५ मिनिटे किंवा त्यापेक्षा कमी | ९ |
| ३.२५ मिनिटांपेक्षा जास्त परंतु ३.३५ मिनिटे किंवा त्यापेक्षा कमी | ६ |
| ३.३५ मिनिटांपेक्षा जास्त परंतु ३.४५ मिनिटे किंवा त्यापेक्षा कमी | ३ |
| ३.४५ मिनिटांपेक्षा जास्त | ० |

**उमेदवार ८०० मीटरचे अंतर धावू न शकल्यास त्यास शून्य गुण देण्यात येतील.**

**(३) पुलअप्स -** क्षितीज समांतर खांबावर उमेदवारास दहा पुलअप्स काढावे लागतील. यासाठी एकूण १० गुण देण्यात येतील म्हणजेच एका पुलअपसाठी १ गुण राहील. उमेदवारांची छाती सहजपणे आडव्या खांबाला टेकल्यानंतर त्याने एक पुलअप्स पूर्ण केला असे समजण्यात येईल असे करताना उमेदवाराने न झगडता अथवा आपले पाय न झाडता किंवा न वाकवता एक पुलअप पूर्ण केल्यास त्यास पूर्ण १ गुण देण्यात येईल. जर

उमेदवारास पुलअप काढता आला नाही म्हणजेच त्याला त्याची छाती आडव्या खांबाला टेकवता आली नाही तर त्या पुलअपसाठी त्याला  गुण मिळणार नाही.

**(४) गोळाफेक-** उमेदवारास ७.२६० किलोग्रॅम वजनाचा गोळा फेकावा लागेल. गोळाफेकीसाठी खालीलप्रमाणे गुण देण्यात येतील.

| **गोळाफेकीचे अंतर (मीटरमध्ये)** | **गुण** |
|---|---|
| ८.५० मीटर किंवा जास्त | २० |
| ७.९० मीटर किंवा जास्त परंतु ८.५० मीटरपेक्षा कमी | १८ |
| ७.३० मीटर किंवा जास्त परंतु ७.९० मीटरपेक्षा कमी | १६ |
| ६.७० मीटर किंवा जास्त परंतु ७.३० मीटरपेक्षा कमी | १४ |
| ६.१० मीटर किंवा जास्त परंतु ६.७० मीटरपेक्षा कमी | १२ |
| ५.५० मीटर किंवा जास्त परंतु ६.१० मीटरपेक्षा कमी | १० |
| ४.९० मीटर किंवा जास्त परंतु ५.५० मीटरपेक्षा कमी | ८ |
| ४.३० मीटर किंवा जास्त परंतु ४.९० मीटरपेक्षा कमी | ६ |
| ३.७० मीटर किंवा जास्त परंतु ४.३० मीटरपेक्षा कमी | ४ |
| ३.१० मीटर किंवा जास्त परंतु ३.७० मीटरपेक्षा कमी | २ |
| ३.१० मीटर पेक्षा कमी | ० |

(अ) गोळा फेकताना एक चूक क्षम्य असेल व त्यासाठी गुण कमी करण्यात येणार नाहीत.

(ब) गोळाफेकीत फेकलेला गोळा जर सीमांकन रेषेच्या मध्यावर पडला तर उमेदवारास नजीकच्या वरच्या श्रेणीतील गुण दिले जातील. (उदा : जर गोळाफेकीचे अंतर ६.१० मीटर असेल तर उमेदवाराला १२ गुण देण्यात येतील.)

**(५) लांब उडी -** यासाठी उमेदवाराला धावत येऊन लांब उडी मारावी लागेल. लांब उडीसाठी खालीलप्रमाणे गुण देण्यात येतील.

| **उडीचे अंतर (मीटरमध्ये)** | **गुण** |
|---|---|
| ५.०० मीटर किंवा जास्त | २० |
| ४.७५ मीटर किंवा जास्त परंतु ५.०० मीटरपेक्षा कमी | १८ |
| ४.५० मीटर किंवा जास्त परंतु ४.७५ मीटरपेक्षा कमी | १६ |
| ४.२५ मीटर किंवा जास्त परंतु ४.५० मीटरपेक्षा कमी | १४ |
| ४.०० मीटर किंवा जास्त परंतु ४.२५ मीटरपेक्षा कमी | १२ |
| ३.५० मीटर किंवा जास्त परंतु ४.०० मीटरपेक्षा कमी | ९ |
| ३.०० मीटर किंवा जास्त परंतु ३.५० मीटरपेक्षा कमी | ६ |
| २.५० मीटर किंवा जास्त परंतु ३.०० मीटरपेक्षा कमी | ३ |
| २.५० मीटरपेक्षा कमी | ० |

उमेदवारास फक्त एकच उडी मारण्याची परवानगी राहील. उडी मारतांना अपघात झाल्यास किंवा चूक म्हणजे उडी मारण्याच्या रेषेवर किंवा रेषेपलिकडे पहिले पाऊल टाकल्यास उमेदवारास एक जादा संधी देण्यात येईल व त्यासाठी गुण कमी केले जाणार नाहीत. जादा संधीचा फायदा घेताना पुन्हा चूक केल्यास वा अपघात घडल्यास उमदेवारास शून्य गुण देण्यात येतील.

**पोलीस शिपाई पदांच्या प्रशिक्षणासाठी उमेदवारांची निवड करण्याकरिता ध्यावयाची शारीरिक चाचणी परीक्षा (महिला उमेदवारांकरिता)**

शारीरिक चाचणीमध्ये खालील बाबींचा समावेश असेल व त्याकरिता एकूण गुण १०० असतील -

**(१) धावणे**

यासाठी उमेदवारास २०० मीटर धावावे लागेल व त्यात खालीलप्रमाणे गुण देण्यात येतील :-

| संपूर्ण २०० मीटर अंतर धावण्यास लागणारा कालावधी (सेकंदा मध्ये) | गुण |
|---|---|
| ३५ सेकंद व त्यापेक्षा कमी | २५ |
| ३५ सेकंदपेक्षा जास्त -- ३६ सेकंदपर्यंत | २३ |
| ३६ सेकंदपेक्षा जास्त -- ३७ सेकंदपर्यंत | २१ |
| ३७ सेकंदपेक्षा जास्त -- ३८ सेकंदपर्यंत | १८ |
| ३८ सेकंदपेक्षा जास्त -- ३९ सेकंदपर्यंत | १५ |
| ३९ सेकंदपेक्षा जास्त -- ४० सेकंदपर्यंत | १२ |
| ४० सेकंदपेक्षा जास्त -- ४१ सेकंदपर्यंत | ९ |
| ४१ सेकंदपेक्षा जास्त -- ४२ सेकंदपर्यंत | ६ |
| ४२ सेकंदपेक्षा जास्त -- ४३ सेकंदपर्यंत | ३ |
| ४३ सेकंदपेक्षा जास्त | ० |

**(२) चालणे**

यासाठी उमदेवारास ३ किलोमीटर्सचे अंतर चालावे लागेल व त्यासाठी खालीलप्रमाणे गुण देण्यात येतील :

| ३ किलोमीटर्स चालण्यास लागणारा कालावधी (मिनिटांमध्ये) | गुण |
|---|---|
| २३ मिनिटे व त्यापेक्षा कमी | २५ |
| २३ मिनिटांपेक्षा जास्त -- २४ मिनिटांपर्यंत | २१ |
| २४ मिनिटांपेक्षा जास्त -- २५ मिनिटांपर्यंत | १७ |
| २५ मिनिटांपेक्षा जास्त -- २६ मिनिटांपर्यंत | १३ |
| २६ मिनिटांपेक्षा जास्त -- २७ मिनिटांपर्यंत | ९ |
| २७ मिनिटांपेक्षा जास्त -- २८ मिनिटांपर्यंत | ५ |
| २८ मिनिटांपेक्षा जास्त -- | ० |

**(३) गोळाफेक**

उमेदवारास ४ किलो वजनाचा गोळा फेकावा लागेल. गोळाफेकीसाठी खालीलप्रमाणे गुण देण्यात येतील :

| **गोळाफेकीचे अंतर (मीटरमध्ये)** | **गुण** |
|---|---|
| ६.०० मीटर व त्यापेक्षा जास्त | २५ |
| ५.५० मीटर व त्यापेक्षा जास्त -- ६.०० मीटरपेक्षा कमी | २० |
| ५.०० मीटर व त्यापेक्षा जास्त -- ५.५० मीटरपेक्षा कमी | १५ |
| ४.५० मीटर व त्यापेक्षा जास्त -- ५.०० मीटरपेक्षा कमी | १० |
| ४.०० मीटर व त्यापेक्षा जास्त -- ४.५० मीटरपेक्षा कमी | ५ |
| आणि ४.०० मीटरपेक्षा कमी | ० |

(अ) गोळा फेकताना एक चूक क्षम्य असेल व त्यासाठी गुण कमी करण्यात येणार नाहीत.

(ब) गोळाफेकीत फेकलेला गोळा जर सीमांकन रेषेच्या मध्यावर पडला तर उमेदवारास नजीकच्या वरच्या श्रेणीतील गुण दिले जातील. (उदा : जर गोळाफेकीचे अंतर ५ मीटर असेल तर उमेदवाराला १५ गुण देण्यात येतील.)

**(४) लांब उडी -** यासाठी उमेदवाराला धावत येऊन लांब उडी मारावी लागेल. लांब उडीसाठी खालीलप्रमाणे गुण देण्यात येतील.

| **उडीचे अंतर (मीटरमध्ये)** | **गुण** |
|---|---|
| ३.८० मीटर किंवा जास्त | २५ |
| ३.५० मीटर किंवा जास्त परंतु ३.८० मीटरपेक्षा कमी | २१ |
| ३.२० मीटर किंवा जास्त परंतु ३.५० मीटरपेक्षा कमी | १८ |
| २.९० मीटर किंवा जास्त परंतु ३.२० मीटरपेक्षा कमी | १५ |
| २.६० मीटर किंवा जास्त परंतु २.९० मीटरपेक्षा कमी | १२ |
| २.३० मीटर किंवा जास्त परंतु २.६० मीटरपेक्षा कमी | ९ |
| २.०० मीटर किंवा जास्त परंतु २.३० मीटरपेक्षा कमी | ६ |
| १.७० मीटर किंवा जास्त परंतु २.०० मीटरपेक्षा कमी | ३ |
| १.७० मीटरपेक्षा कमी | ० |

उमेदवारास फक्त एकच उडी मारण्याची परवानगी राहील. उडी मारतांना अपघात झाल्यास किंवा चूक म्हणजे उडी मारण्याच्या रेषेवर किंवा रेषेपलिकडे पहिले पाऊल टाकल्यास उमेदवारास एक जादा संधी देण्यात येईल व त्यासाठी गुण कमी केले जाणार नाहीत. जादा संधीचा फायदा घेताना पुन्हा चूक केल्यास वा अपघात घडल्यास उमदेवारास शून्य गुण देण्यात येतील.

# जाहिरात

## महाराष्ट्र राज्य पोलीस शिपाई भरती सन ००००

**जाहिरात क्रमांक** **ठिकाण** **दिनांक ००/००/००००**

_____________ पोलीस घटकात दिनांक ००/००/०००० रोजी पोलीस भरती आयोजित करण्यात आलेली आहे. उमेदवाराने या कार्यालयामार्फत प्रसिध्द करण्यात आलेले आणि विनामूल्य उपलब्ध असलेले "आवेदन अर्ज" भरून आवश्यक त्या कागदपत्रासह व्यक्तिशः ________________या ठिकाणी दि. ००/००/०००० रोजी दुपारी १२.०० वाजेपर्यंतच आवेदन अर्ज घेवून येणाऱ्या उमेंदवारांना प्रवेश दिला जाईल. त्यानंतर आलेल्या उमेंदवारांना प्रवेश दिला जाणार नाही. उमेदवाराने रू ५०/- ची इंडीयन पोस्टल ऑर्डर किंवा डिमांड ड्राफ्ट "_________________" या नावाने जमा केल्यानंतर आवेदन अर्ज स्वीकारण्यात येतील.

(जिल्हा / आयुक्तालयाचे नाव) पोलीस घटकात खाली दर्शविल्याप्रमाणे पोलीसांची रिक्त पदे भरण्यासाठी पोलीस भरती आयोजित करण्यात आलेली आहे.

| अ. क्र. | पद | अजा | अज | विमाप्र | विज-अ | भज-ब | भज-क | भज-ड | इमाव | खुला | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | | | | | |

- **खेळाडू, माजी सैनिक, प्रकल्पग्रस्त, भूकंपग्रस्त, गृहरक्षक दल यांचेकरिता असलेले आरक्षण हे समांतर आरक्षण असून ते सामाजिक आरक्षणांतर्गत समाविष्ट आहे. (संदर्भ : शासन परिपत्रक क्रमांक एसआरव्ही-१०९७/प्र.क्र.३१/९८/१६-अ, दि. १६/३/१९९९)**

**टिप :** वर दर्शविलेली पदसंख्या व आरक्षणात बदल होण्याची शक्यता असू शकते, त्यामध्ये बदल करण्याचे अधिकार हे सक्षम प्राधिकाऱ्यास राहतील. **सदरची पदे मागील अनुशेष विचारात घेवून दर्शविण्यात आलेली आहेत.**

**वेतनश्रेणी : पोलीस शिपाई पदाची वेतनश्रेणी रू ३२००-८५-४९०० + विशेष वेतन रू ५००/- . शासन निर्णय अं.नि.ओ. १००५५/१२६/सेवा-४, दि. ३१/१०/२००५ अन्वये नियुक्तीस पात्र ठरणाऱ्या पोलीस शिपायांस "परिभाषिक अंशदान निवृत्तीवेतन योजना" लागू ठरेल.**

**वयोमर्यादा :** दि. ००/००/०००० रोजी वय १८ वर्षे पूर्ण आणि २५ वर्षापेक्षा अधिक नसावे, मागासवर्गीयांना ५ वर्षे शिथिलक्षम.

**शैक्षणिक अर्हता :** महाराष्ट्र माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळे अधिनियम, १९६५ (सन १९६५ चा महाराष्ट्र अधिनियम ४१) अन्वये प्रस्थापित केलेल्या विभागीय मंडळाकडून घेण्यात येणारी उच्च माध्यमिक शाळा प्रमाणपत्र परीक्षा (इयत्ता १२ वी) किंवा शासनाने या परीक्षेस समकक्ष **(राष्ट्रीय मुक्त विद्यालय, नवी दिल्ली यांची सिनीयर सेकेंडरी स्कूल परिक्षा तसेच सीबीएसई बारावी परीक्षा या दोन्ही परिक्षा ह्या राज्य मंडळातर्फे घेण्यात येणाऱ्या १२ इयत्तेच्या परीक्षेशी समकक्ष आहेत)** घोषित केलेली परीक्षा उत्तीर्ण असणे आवश्यक आहे.

**शारीरिक पात्रता : महिला :**किमान उंची : १५५ सें.मी.

**पुरूष :**किमान उंची : १६५ से.मी.
छाती : न फुगवता ७९ सें.मी. (न फुगविलेली छाती व फुगवलेली छाती यातील फरक ५ सें. मी. पेक्षा कमी नसावा.).

**चाचणी :** शारीरिक पात्रता पूर्ण करणाऱ्या उमेदवारांची १०० गुणांची शारीरिक चाचणी, ७५ गुणांची लेखी चाचणी आणि २५ गुणांची मुलाखत चाचणी घेण्यात येईल.

शारीरिक चाचणी खालील प्रमाणे राहील :

पुरूष : (१) १०० मिटर्स धावणे, (२) ८०० मिटर्स धावणे, (३) पुल अप्स (१०),
(४) लांब उडी (५) गोळा फेक.
महिला : (१) २०० मिटर्स धावणे (२) ३ किमी चालणे (३) लांब उडी
(४) गोळा फेक (४ कि.ग्रा.)

लेखी चाचणी पुढील प्रमाणे राहील : (१) अंकगणित (२) सामान्यज्ञान व चालू घडामोडी (३) मराठी भाषेत निबंध लेखन

**नक्षलग्रस्त भागासाठी विशेष तरतूद :** शासनाने घोषित केलेल्या नक्षलग्रस्त भागातील रहिवासी असलेल्या अनुसूचित जमातीसाठी व नक्षलवाद्यांच्या हल्ल्यात मृत / गंभीर जखमी झालेल्या पोलीस बातमीदार, पोलीस पाटील व पोलीस कर्मचारी यांच्या मुलांमधील इयत्ता ७वी परीक्षा उत्तीर्ण उमेदवार अर्ज करू शकतात.

तसेच सदर महिला व पुरूष उमेंदवारांना उंची मध्ये २.५ से.मी. सुट देय राहील आणि पुरूष उमेदवाराच्या छातीच्या मोजमापात सूट देय राहील.

**बँडस्मन :** बॅन्ड पथकातील पदासाठी अर्ज करणाऱ्या उमेदवारांना बॅण्ड पथकातील वाद्यांची माहिती असणे व वाद्य वाजविण्याचा अनुभव असणे आवश्यक आहे. बँडस्मन पदासाठी १० वी उत्तीर्ण उमेदवार अर्ज करू शकतील.

तसेच सदर उमेंदवारांना उंची मध्ये २.५ से.मी. व छाती मध्ये २ सें.मी. न फुगवता / १.५ से.मी. फुगवून इतकी सूट देय राहील. सदर सवलत देण्याचे अधिकार पोलीस महासंचालक व पोलीस महानिरीक्षक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांना राहतील.

**महिलासांठी आरक्षण:** उपरोक्त नमुद घटकातील पदांमध्ये शासन नियमाप्रमाणे महिलांसाठी ३०% इतके समांतर आरक्षण असुन एखाद्या संवर्गात त्या प्रमाणात महिला उमेदवार उपलब्ध न झाल्यास सदर रिक्त पदे पात्र पुरूष उमेदवारामधून भरण्यात येतील.

**गृहरक्षक दल (होमगार्ड) आरक्षण:** एकूण पदांच्या ५% इतके समांतर आरक्षण पदे गृहरक्षक दलातून भरण्यात येतील. उमेदवाराची भरतीच्या दिनांका पूर्वी अथवा भरतीच्या नियोजित दिनांकापर्यंत गृहरक्षकदलामध्ये कमीत कमी ३ वर्ष सेवा पूर्ण झालेली असणे आवश्यक आहे.

**माजी सैनिक आरक्षण:** एकूण पदांच्या १५% इतके समांतर आरक्षण पदे ही माजी सैनिकातून भरण्यात येतील. तसेच त्यांच्या वयामध्ये त्यांची सैन्यदलात जितकी सलग सेवा (सहा महिन्यांपेक्षा कमी नाही) झाली असेल तेवढी वर्षे अधिक ३ वर्षे इतकी सवलत देय राहील.

**धरणग्रस्त / प्रकल्पग्रस्त आणि भुकंपग्रस्त आरक्षण** : एकूण पदांच्या ५% **(शा. नि. क्र. ईक्यूआर-२००६/प्र.क्र.-१०४/भुपूक, दि. १७/४/२००७ अन्वये ३% भूकंपग्रस्त आणि २% धरणग्रस्त / प्रकल्पग्रस्त राखीव राहतील)** इतके समांतर आरक्षण पदे ही धरणग्रस्त / प्रकल्पग्रस्त आणि भूकंपग्रस्त प्रवर्गातून भरण्यात येतील. शासनाने वेळोवेळी दिलेल्या सवलती सदर उमेंदवारांना पोलीस भरतीच्या वेळी देय राहतील.

**खेळाडू उमेदवार :** एकुण पदांच्या घटक निहाय ५% पदे खेळाडू उमेदवारातून भरण्यात येतील. खेळाडूंबाबत शासनाने वेळोवेळी दिलेल्या सवलती व निर्देशानुसार भरण्यात येतील. सदरची सूट फक्त पुढे नमूद क्रिडा कामगिरी करणाऱ्या खेळाडूसाठीच देय राहील (१) **राज्यस्तर (आंतर जिल्हा) पदक विजेता (२) अखील भारतीय आंतर् विद्यापीठ स्तर प्रतिनिधित्व (३) राष्ट्रीय स्तर प्रतिनिधित्व (४) आंतरराष्ट्रीय स्तर प्रतिनिधित्व.**

**खेळाची नावे :**

| | | |
|---|---|---|
| १) आर्चरी (धनुविद्या) | २) ॲथलेटिक्स व क्रॉस कन्ट्रीं | ३) ॲक्वेटिक्स (पाण्यातील खेळ) |
| ४) बॅडमिंटन | ५ ) बॉक्सिंग | ६) बास्केटबॉल |
| ७) जिम्नॅस्टिक्स | ८) हॅण्डबॉल | ९) खो-खो |
| १०) ज्युडो | ११) कबड्डी | १२) रोवींग |
| १३) लॉन टेनिस | १४) शूटींग | १५) वेटलिफ्टिंग |
| १६) टेबल टेनिस | १७) व्हॉलिबॉल | १८) तायक्वांदो |
| १९) कुस्ती | २०) हॉकी | २१) बिलीयर्डस व स्नूकर |
| २२) फूटबॉल | २३) कराटे | २४) पॉवर लिफ्टिंग |
| २५) बॉडी बिल्डिंग | २६) क्रिकेट | २७) कॅनोईंग-कयाकिंग (होडी वल्हविणे) |
| २८) रग्बी | | |

तसेच पुरूष व महिला खेळाडूंना किमान उंचीच्या अटीमध्ये २.५ से.मी. इतकी सूट देय राहील.

**अर्जदारासाठी आवश्यक सूचना :**

१) "आवेदन अर्ज' हे खालील ठिकाणी वितरीत केले जातील.
ठिकाणांची नावे (वेळ _____ ते _____ वाजेपर्यंत) : १) _____________ २) _____________
३) __________ ४) ___________ ५) ____________ ६) ____________ . . .. .
अर्ज वेबसाईटवरून डाऊनलोड करून किंवा स्पष्ट झेरॉक्स असेल, तर स्वीकारण्यात येईल.

२) "आवेदन अर्ज' जमा करतांना रू. ५०/- चा इंडीयन पोस्टल ऑर्डर किंवा डिमांड ड्राफ्ट घटक प्रमुखांच्या नावाने देण्यात यावा. घटक प्रमुखांचे नाव अचूक लिहावे. अर्ज जमा केल्यानंतर उमेदवारांना लगेच प्रवेश पत्र देण्यात येतील.

(उदाहारणार्थ : पुणे पोलीस आयुक्तालयाच्या कार्यकक्षेतील पदासाठी अर्ज करावयाचा असल्यास "पोलीस आयुक्त, पुणे शहर" यांच्या नावाने किंवा पुणे ग्रामीण पोलीस अधीक्षक कार्यालयाच्या कार्यकक्षेतील पदासाठी अर्ज करावयाचा असल्यास **"पोलीस अधीक्षक, पुणे ग्रामीण"** यांच्या नावाने किंवा समादेशक, राज्य राखीव पोलीस बल गट १, पुणे यांच्या कार्यकक्षेतील पदासाठी अर्ज करावयाचे असल्यास **"समादेशक, राज्य राखीव पोलीस बल, गट क्र. १, पुणे"** यांच्या नावाने इंडियन पोस्टल ऑर्डर किंवा डिमांड ड्राफ्ट जमा करावा)

३) अर्जदाराने अर्जासोबत खालील (लागू असलेल्या) प्रमाणपत्राची सुस्पष्ट दिसतील अशा सक्षम प्राधिकाऱ्याने साक्षांकित केलेल्या छायांकित प्रती जोडणे आवश्यक आहे.

१) शाळा सोडल्याचा दाखला.

२) शैक्षणिक पात्रतेचे प्रमाणपत्र, गुणपत्रक.

३) जातीचे प्रमाणपत्र व जात पडताळणीचे वैधता प्रमाणपत्र.

टिप : मागासवर्गीय उमेदवारांनी जात वैधता प्रमाणपत्र नियुक्तीच्या दिनांकापासून सहा महिन्याचे आत जमा करणे आवश्यक आहे.

४) प्रकल्पग्रस्त असल्यास त्याबाबत जिल्हा पुनर्वसन अधिकारी यांच्याकडील प्रमाणपत्र

५) अधिवास (डोमेसाईल) प्रमाणपत्र

६) सामाजिक न्याय विभागाने निश्चित केलेले निकष व अटीनुसार उन्नत व प्रगत गटात मोडत नसल्याचे (नॉन-क्रिमीलियर) निकटतम वर्षाचे कालावधीचे प्रमाणपत्र.

७) विविध आरक्षण प्रवर्गात मोडणाऱ्या उमेदवारांनी संबंधित प्रवर्गाचे प्रमाणपत्र.

प्रमाणपत्राच्या छाननीच्या वेळी उमेदवारांनी उपरोक्त मुळ (Original) प्रमाण पत्रे दाखवणे बंधनकारक आहे. मुळ प्रमाण पत्रे उपलब्ध नसल्यास उमेदवारास अपात्र ठरविण्यात येईल.

४) सर्व अटींची व आवश्यक त्या सर्व कागदपत्रांची पूर्तता करणारे उमेदवार सदर पदासाठी अर्ज करणेस पात्र राहतील.

५) सदर पोलीस भरतिची विस्तृत माहिती www.maharashtra.gov.in / www.mahapolice.gov.in या संकेत स्थळावर तसेच पोलीस मुख्यालयातील नोटीस बोर्डावर उपलब्ध राहील.

६) पोलीस भरतीतील प्रत्येक प्रक्रियेबाबत निवड समितीचा निर्णय अंतिम राहील.

७) पोलीस भरती प्रक्रीयेच्या वेळी उमेदवारास कोणतीही शारिरीक इजा / नुकसान झाल्यास त्यास शासन जबाबदार राहणार नाही.

८) भरती प्रक्रियेमध्ये कोणत्याही प्रकारची वशीलेबाजी किंवा गैरप्रकाराचा अवलंब केल्यास उमेंदवारास अपात्र ठरविण्याात येईल.

oooo

## आवेदन अर्ज

| ज्या पदासाठी अर्ज केला तेथे ✓ अशी खूण करावी. | **पोलीस शिपाई** | |
|---|---|---|
| | **बँडस्मन** | |

**कार्यालयीन उपयोगासाठी**

**१) अर्ज स्वीकृती क्रमांक** ☐☐☐☐☐

**२) दिनांक :** ☐☐/☐☐/☐☐☐☐

**३) प्रवेश फी : रू. ५०/-**

बँकेचे नाव / पोस्टाचे नाव ______________________________

डिमांड ड्राफ्ट क्र. / पोस्टल ऑर्डर क्रमांक _________दिनांक________

| अर्जासोबत २.५ सेमी x २.५ सेमी आकाराचे ४ फोटो द्यावे. एका फोटोवर स्वाक्षरी करून या जागी चिटकवावा व इतर फोटो स्वाक्षरी करून अर्जा सोबत जोडावे |
|---|

**अर्ज घेणाऱ्या अधिकाऱ्याची सही**

टिप : अर्ज घेणाऱ्या अधिकाऱ्याने ५० रूपायाचा डीडी / पोस्टल ऑर्डर घेवून अर्जावर वरिल रकान्यात डीडी/पोस्टल ऑर्डर क्रमांक नमूद करून अर्ज स्विकारावेत.

---

**सुचना :** १) अर्जदाराने माहिती मराठीत लिहावी व दर्शविलेल्या ठिकाणची माहिती फक्त इंग्रजीत लिहावी. आवश्यक नसेल तेथे खोडावे.

२) आवेदन अर्जात अंक फक्त इंग्रजीत लिहावे.

३) आवेदन अर्ज पूर्ण भरलेले नसतील तर उमेदवारांना अपात्र ठरविण्यात येईल.

४) आवेदन अर्ज विनामुल्य आहेत.

**अ) अर्जदाराची वैयक्तिक माहिती :**

१) अर्जदाराचे संपूर्ण नांव : **आडनांव** **नांव** **वडिलांचे / पतीचे नाव**

मराठीत : ____________________ ____________________ ______________________________

इंग्रजीत : ☐☐☐☐☐☐☐☐☐☐☐☐☐☐☐☐☐☐☐☐☐☐☐
☐☐☐☐☐☐☐☐☐☐☐☐☐☐☐☐☐☐☐☐☐☐☐

२) सध्याचा पत्ता : ______________________________________________________

तालुका :________________जिल्हा :_____________पीन कोड ☐☐☐☐☐☐

३) कायमचा पत्ता : ______________________________________________________

तालुका :________________जिल्हा :_____________पीन कोड ☐☐☐☐☐☐

४) जन्मदिनांक :

| दिवस | | महिना | | वर्ष | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | |

| जन्म स्थळ / ठिकाण |
|---|
| |

दिनांक ००/००/०००० रोजीचे वय

| दिवस | महिना | वर्ष |
|---|---|---|
| | | |

५) योग्य त्या ठिकाणी ✓ अशी खूण करावी.

| पुरूष | महिला |
|---|---|
| | |

६) शारिरीक पात्रता:

पुरूष अर्जदार : उंची __________से.मी./छाती : (न फुगवता _____से.मी. फुगवुन ______ सेमी)

महिला अर्जदार : उंची __________से.मी.

७) **अ)** धर्म : _______________ **ब)** जात : _____________ **क)** पोटजात : ________________

८) अर्जदार खालीलपैकी ज्या प्रवर्गाचा आहे त्या प्रवर्गाखाली **(✓)** अशी खूण करावी.

| प्रवर्ग | अ. जा. | अ. ज. | वि. जा (अ) | भ.ज. (ब) | भ.ज. (क) | भ. ज. (ड) | विमाप्र | इमाव | खुला | अर्जदार "नॉन क्रिमिलेअर' (NCL) मध्ये मोडतात काय? | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| लागु रकान्यात (✓अशी खूण करावी | | | | | | | | | | होय * | नाही | लागू नाही |
| | | | | | | | | | | * होय म्हटल्यास NCL प्रमाण पत्र जोडणे आवश्यक आहे | | |

९) अर्जदार मागास प्रवर्गाचे असल्यास जातीचा दाखला सक्षम प्राधिकाऱ्याने दिलेला असावा, व जात पडताळणीचे वैधता प्रमाणपत्र असल्यास सोबत जोडावे. तसेच दाखला कोणी दिला आहे ? त्याचा क्रमांक व दिनांक नमूद करावा.

दाखला निर्गमित केलेल्या प्राधिकाऱ्याचे पदनाम : ____________________________________________

दाखला क्रमांक व दिनांक : ____________________________________________________________

**सूचना :** जातीच्या वैधता प्रमाणपत्रासाठी अर्ज केलेला असल्यास संबंधित विभागाकडे अर्ज दाखल केल्याची मूळ पावती अर्जासोबत सादर करणे बंधनकारक आहे. नियुक्ती झाल्यास सदरचे प्रमाणपत्र ६ महिन्याच्या आत सादर करण्याबाबतचे हमीपत्र द्यावे लागेल. विहित कालावधीत प्रमापपत्र सादर न केल्यास नियुक्ती रद्द केली जाईल.

**ब) अर्जदाराची शैक्षणिक माहिती :**

१०) शैक्षणिक अर्हता :

| शिक्षण | शैक्षणिक संस्थेचे नाव (विद्यालय / महाविद्यालय) | बोर्ड / विद्यापीठ | उत्तीर्ण झाल्याचे वर्ष | मिळालेले गुण | मिळालेली टक्केवारी |
|---|---|---|---|---|---|
| १) माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षा (इ. १०वी) | | | | | |
| २) उच्च माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षा (इ. १२वी) | | | | | |
| ३) पदवी, | | | | | |
| ४) पदव्युत्तर परीक्षा | | | | | |
| ५) इतर | | | | | |

११) इतर शैक्षणीक अर्हता :
संगणक प्रशिक्षीत आहे काय : होय / नाही.
(शासनमान्य एम.एस.सी.आय.टी किंवा तत्सम संगणक परीक्षा उत्तीर्ण असल्यास त्याच्या प्रमाणपत्राची छायांकित प्रत जोडावी)

**क) अर्जदाराची इतर माहिती :**

१२) महाराष्ट्र राज्याचे कायमचे रहिवासी (Domicile)आहात का ? होय / नाही
(असल्यास साक्षांकित प्रमाणपत्र जोडावे )

१३) अर्जदार खालील नमूद प्रवर्गात मोडतो काय ? होय / नाही
असल्यास, ज्या प्रवर्गातून भरतीसाठी उभे राहू इच्छिता अशा लागू असलेल्या कोणत्याही एका रकान्यात (✓) अशी खूण करावी.

अ) गृहरक्षक दल ☐
ब) माजी सैनिक ☐
क) प्रकल्पग्रस्त ☐
ड) भूकंपग्रस्त ☐

१४) अर्जदार खेळाडू आहे काय ? होय / नाही.
अर्जदार खेळाडू म्हणून अर्ज करीत असल्यास, त्याची खालील क्षेत्रात नमूद क्रीडा कामगिरी असणे आवश्यक आहे व त्याप्रमाणे त्याने त्यापुढे (✓) अशी खूण करावी व आवश्यक प्रमाणपत्र जोडावे.

| खेळाचे नाव | खेळल्याचे वर्ष | राज्यस्तर (आंत्र जिल्हा) पदक विजेता | अखिल भारतीय आंतरविद्यापीठ स्तर प्रतिनिधित्व | राष्ट्रीय स्तर प्रतिनिधित्व | आंतरराष्ट्रीय स्तर प्रतिनिधित्व |
|---|---|---|---|---|---|
| | | | | | |

१५) बँडस्मन म्हणून अर्ज करित असल्यास,
अ) अर्जदारास वाद्य वाजविता येते काय ? असल्यास कोणते ? ____________________
ब) संगीतात विशेष प्राविण्य मिळाले आहे काय ? असल्यास, त्याबाबतचे प्रमाणपत्र जोडावे. ______________

१६) जड वाहन चालक परवाना -- आहे / नाही
हलके वाहन चालक परवाना -- आहे / नाही

१७) यापूर्वी कोठे नोकरी केली आहे का ? होय / नाही.
असल्यास, त्याबाबत खालील तक्त्यात तपशील द्यावा :

| अ.क्र. | संस्थेचे नाव | अर्जदार कोणत्या पदावर काम करीत होता / आहे. | सेवा कालावधी पासून पर्यंत | सेवा सोडण्याची कारणे |
|---|---|---|---|---|
| | | | | |

१८) उमेदवार पोलीस अंमलदाराचा मुलगा / मुलगी आहे काय ? असल्यास, त्याबाबतचा तपशील नमूद करावा. (नांव / बक्कल क्रमांक / नेमणूकीचे ठिकाण / जिल्हा) __________________________ होय / नाही.

१९) अ) पोलीस खात्यामध्ये उमेदवाराचा सखखा भाऊ / बहिण आहे काय ? असल्यास, त्याबाबतचा तपशील. (नांव / बक्कल क्रमांक / नेमणूकीचे ठिकाण / जिल्हा) होय / नाही.

२०) अर्जदारास पोहता येते का ? होय / नाही

२१) एन.सी.सी. प्रमाणपत्र आहे काय ? होय / नाही

| **प्रकार** | **वर्ष** | **श्रेणी** |
|---|---|---|
| एन.सी.सी (ए) | | |
| एन.सी.सी (बी) | | |
| एन.सी.सी (सी) | | |

२२) इतर छंद / आवड असल्यास तपशील (प्रमाणपत्र जोडावे).

२३-अ) अर्जदारावर यापूर्वी कोणत्याही अपराधाबद्दल आतापर्यंत कधीही अटक करण्यात / स्थानबध्द करण्यात / बध्द करण्यात / दंड करण्यात / सिद्ध दोषी ठरवण्यात आले आहे काय, किंवा लोकसेवा आयोगाकडून त्यांच्या परीक्षांना / निवडींना बसण्यास तुम्हाला मनाई करण्यात आली आहे काय, किंवा अनर्ह ठरवण्यात आले आहे काय, किंवा कोणत्याही विद्यापीठाकडून किंवा इतर कोणत्याही शैक्षणिक प्राधिकरणाकडून / संस्थेकडून कोणत्याही परीक्षेस बसण्यास मनाई करण्यात आली आहे काय / काढून टाकण्यात आले आहे काय ? होय / नाही

२३-ब) हा आवेदन अर्ज भरतेवेळी कोणत्याही न्यायालयात, विद्यापीठात किंवा इतर कोणत्याही शैक्षणिक प्राधिकरणात / संस्थेत तुमच्याविरूध्द कोणतेही प्रकरण प्रलंबित आहे काय? होय / नाही

[(२३-अ) किंवा (२३-ब) चे उत्तर "होय' असेल तर हा अर्ज भरताना सदर खटला, अटक स्थानबध्दता, दंड, दोषसिध्दी, शिक्षादेश इत्यादीचा संपूर्ण तपशील आणि न्यायालय / विद्यापीठ / शैक्षणिक प्राधिकरणात इत्यादी ठिकाणी प्रलंबित असलेल्या प्रकरणांचे स्वरूप स्पष्ट करावे.]

२४) अर्जदार महाराष्ट्र नागरी सेवा (लहान कुटुंबाचे प्रतिज्ञापन) नियम, २००५ नुसार अर्जासोबत दिलेल्या नमुन्या मध्ये लहान कुटुंबाचे प्रतिज्ञापन सादर करतील.

## प्रतिज्ञापन

मी, श्री / श्रीमती / कुमारी ____________________

श्री ____________________ यांचा / यांची मुलगा / मुलगी / पत्नी,

वय __________ वर्षे, राहणार ____________________ याद्वारे पुढीलप्रमाणे असे जाहीर करतो / करते की,

(१) मी ____________________ या पदासाठी माझा अर्ज दाखल केलेला आहे.

(२) आज रोजी मला __________ (संख्या) इतकी हयात मुले आहेत.

(३) हयात असलेल्या मुलांची संख्या दोनपेक्षा अधिक असेल तर या पदासाठी मी अनर्ह ठरविण्यास पात्र होईल याची मला जाणीव आहे.

ठिकाण :

दिनांक : (सही)

**<u>अर्जदाराने द्यावयाचे प्रतिज्ञापत्र.</u>**

मी याद्वारे प्रतिज्ञापुर्वक असे जाहीर करतो / करते की, वरील माहिती जाणीवपुर्वक तसेच विश्वासपुर्वक दिली असून ती खरी आहे. जाहीरातीत दिलेल्या सर्व निकषांनुसार व शैक्षणिक अर्हतेनुसार मी पात्र आहे. अर्जात नमूद केलेली कोणतीही माहिती खोटी आढळल्यामुळे माझा अर्ज फेटाळून लावल्यास किंवा निवडीच्या कुठल्याही टप्प्यावर माझी निवड / नियुक्ती रद्द केल्यास त्याबाबत माझी काहीही तक्रार राहणार नाही. अर्जात नमुद केलेली माहिती खोटी अथवा चुकीची असल्यास त्याची पूर्णपणे जबाबदारी माझ्यावर राहील व त्याबाबतीत माझ्याविरध्द कायदेशीर कारवाईस मी पात्र राहीन. तसेच मी भरती प्रक्रियेमध्ये कोणत्याही प्रकारची वशिले बाजी किंवा गैरप्रकाराचा अवलंब केल्यास मीं अपात्र ठरेन.

ठिकाण : अर्जदाराची सही

दिनांक नांव

सोबत : अर्जात नमूद केलेल्या बाबींच्या आवश्यक प्रमाणपत्रांच्या प्रमाणित केलेल्या छायांकित प्रती.